The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत साहित्य आणि वाङ्मयप्रकार

प्रा. पोले गजानन शिवबाराव
**(जिजाऊ ज्ञानतीर्थ माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय, परभणी)**

प्रास्ताविक

मध्ययुगीन मानवी जीवन हे धर्मकेंद्रित होते. धर्माचा आधार घेतल्याशिवाय कोणत्याही कृतीउक्तिला प्रतिष्ठा प्राप्त होत नव्हती. विशिष्ट धार्मिक विचारसरणीचा स्वीकार करून त्यानुसार आचरण करणाऱ्या व्यक्तीचा गट असेच या धर्मसंप्रदाचे स्वरूप होते. संप्रदायाच्या प्रचार-प्रसाराचे माध्यम त्यांचा साधनामार्ग असतो. त्याचे विवरण करणारे साहित्य हेही असते. संप्रदायाच्या स्वतःच्या अशा गरजा असतात. त्या पूर्ण करणारे साहित्य सांप्रदायिकाकडून त्यांचा धर्मसाधनेचा भाग म्हणून निर्माण होत असते. मध्ययुगीन कालखंडात काही धर्मसंप्रदाय उदयाला आलेले आहेत. त्यात नाथ, महानुभाव, वारकरी, दत्त, समर्थ इत्यादी संप्रदायाचा उल्लेख करावा लागतो. या संप्रदायातील लेखक आणि कवींनी संप्रदायाचा आचारधर्म, उपासना, पद्धती, तत्त्वज्ञान, समाजाला सांगण्यासाठी साहित्यनिर्मिती केली. 12 व्या शतकात उदयाला आलेल्या वारकरी संप्रदायातील संतकवींनी तत्कालीन समाजाला हितोपदेश करण्यासाठी साहित्य निर्मिती केली.

वारकरी संप्रदायातील संतांमध्ये निवृत्तीनाथ, ज्ञानदेव, सोपानदेव, मुक्ताबाई, नामदेव जनाबाई, गोराकुंभार, सावतामाळी, नरहरी सोनार, चोखामेळा, सोयराबाई, बंकामहार, कर्ममेळा, निर्मळा, सेनान्हावी, विसोबा खेचर जगन्नमित्र नागा, परिसाभागवत, जोगा परमानंद, कान्होपात्रा, भानुदास, एकनाथ, तुकाराम, रामदास, निळोबा, बहिणाबाई, आदी संतांनी साहित्य निर्मिती केली. ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी', 'चांगदेव पासष्टी', 'अभंग', 'गौळण', 'नामदेवाची अभंग गाथा', एकनाथानी एकनाथी भागवत, चतुश्लोकी भागवत, भावार्थरामायण, रुक्मिणीस्वयंवर, अभंग, गौळणी, भारुड, तुकारामांनी 'अभंगगाथा' लिहिली. रामदासानी 'दासबोध', 'करुणाष्टक' 'मनाचेश्लोक' लिहिले. निळोबा, बहिणाबाईंनी अभंगाचे लेखन केले. संत हे समाजाच्या विविध स्तरातून निर्माण झाले होते. समाजजीवनाचा प्रत्यक्ष अनुभव त्यांनी घेतला होता. तोच अनुभव त्यांनी आपल्या साहित्यातूनमांडला आहे. हा अनुभव त्यांनी ओवी, अभंग, गौळण, भारुड, विरहिणी, भूपाळी, पद, आरती, श्लोक, आख्यानकाव्य या साहित्यप्रकारातून मांडला आहे. यावरून असे लक्षात येते की, संतांनी केलेली वाङ्मय निर्मिती ही गद्यात्मक व पद्यात्मक स्वरूपाची असून संतांनी ओवी आणि अभंग या साहित्य प्रकारात जास्त लेखन केल्याचे दिसून येते. इतरही साहित्य प्रकारात लेखन केले. अशा साहित्यप्रकाराची ओळख पुढील प्रमाणे करून देता येईल.

**संत साहित्यातील वाङ्मयप्रकार**

संतांना वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान, आचारधर्म, उपासनापद्धती, समाजाला सांगण्यासाठी साहित्यनिर्मिती केली. हे साहित्य समाजापर्यंत नेऊन पोहोचविण्यासाठी विविध वाङ्मयप्रकाराचा उपयोग

केला. त्यामध्ये ओवी, अभंग, गौळण, भारुड, विरहिणी, भूपाळी, पद, आरती, श्लोक, आख्यानकाव्य अशा काही निवडक वाङमय प्रकारची ओळख पुढीलप्रमाणे करून देता येईल.

**1. ओवी**

मराठीच्या आरंभीच्या काळात कवींनी ज्या काही रचना केल्या आहेत. त्या ‘ओवी’ या छंदात केल्या असून त्यांना अक्षरछंद अथवा छांदसरचना असे म्हणतात. मौखिक परंपरेप्रमाणेच लिखित परंपरेतही ‘ओवीला’ महत्त्वपूर्ण स्थान आहे. 12 व्या शतकापासून ते 18 व्या 19 व्या शतकापर्यंत अनेक वर्णनात्मक व टीकात्मक ग्रंथ ओवी छंदात लिहिलेले आढळतात. म्हणून ओवी हा मध्ययुगीन साहित्यातील महत्त्वाचा वाङमयप्रकार आहे. ओवी प्रारंभी मौखिक होती. याचा सर्वात जुना उल्लेख ‘मानसोल्ल्यास’ ग्रंथातील आहे. त्यात स्त्रिया दळण कांडण करताना ओव्या गात असल्याचा उल्लेख आहे.

ओवी हा गेय स्वरूपाचा वाङमयप्रकार आहे लोकगीतातून येणारी ओवी आणि ग्रंथातून येणारी ओवी असे त्यांचे वर्गीकरण करता येते. ओवी हा वाङमयप्रकार महानुभाव व वारकरी संप्रदायातील कवी व लेखकाप्रमाणेच अन्य संप्रदायातील कवींनी ही हाताळल्याचे दिसून येते. ओवी मधून ज्याप्रमाणे कथा सांगितली जाते त्याचप्रमाणे तत्त्वज्ञान ही सांगितले जाते. म्हणून मध्ययुगीन काळात उत्कट भावनाविष्कार करण्यासाठी ओवीचा वापर केलेला आढळतो.

वारकरी संप्रदायातील संत ज्ञानेश्वरांनी ‘ज्ञानेश्वरी’, हा तत्त्वज्ञानपर ग्रंथ ‘ओवी’ या वाङमयप्रकारच लिहिला. एकनाथचे ‘एकनाथी भागवत’, ‘चतुश्लोकी भागवत’, ‘भावार्थरामायण’, ‘रुक्मिणीस्वयंवर’ हे ग्रंथ ओवीबद्ध आहेत. इतरही संतांनी कमी अधिक प्रमाणात ओवी या वाङमयप्रकारात लेखन केले. परंतु ओवीला लौकीक प्राप्त करून दिला. तो ज्ञानेश्वरीनीच, ‘ओवी’ ज्ञानेशाची’ असे जे म्हटले जाते ते या अर्थानेच. ज्ञानेश्वराच्या ओवीचे सामर्थ्य आणि वैभव सांगताना एकनाथ म्हणतात.

“ज्ञानेश्वरा पाठी जो ओवी। करीन मराठी ।।
तेणे अमृताचीया ताटी। जाणनरोटी ठेविली।।”

ओवीमध्ये शेवटचा चरण (म्हणजे ओळ) सामान्यतः चार अक्षरी किंवा सात अक्षरी असते. पहिल्या तीन चरणांच्या शेवटच्या अक्षरांचे यमक साधलेले असते. थोडक्यात ओवी म्हणजे चार चरणांची रचना, पहिल्या तीन चरणात यमक असणे आवश्यक, पहिल्या तीन चरणाहून चौथा चरण लहान असावा. अशी ओवीची रचना असल्याचे दिसून येते.

**2. अभंग**

वारकरी संप्रदायातील संतांनी आपल्या अध्यात्मिक अनुभवाच्या आविष्कारासाठी ‘अभंग’ या वाङमयप्रकाराची निवड केली. अभंगाचा उगम हा वारकरी संप्रदायात झालेला आहे. त्याचा विस्तारही याच संप्रदायात झाला आहे. व त्याचा विकासही याच संप्रदायाने केल्याचा दिसतो. या वाङ्मयप्रकाराच्या माध्यमातून संतांनी परमेश्वर भक्तीचा उत्कट अविष्कार साधलाआहे. अभंग हा भजन कीर्तनात गावयाचा असल्याने त्याचे स्वरूप गीतप्रधान आहे. हा एक साधा आणि सोपा वाङ्मयप्रकार असून

समूहमनाला आवाहन करण्याचे सामर्थ्य अभंगात आहे. आत्माविष्कार प्रकट करण्यासाठी अभंग हा आकृतीबंध महत्त्वाचा ठरला. त्याचप्रमाणे उपदेश, प्रचार, सामाजिकजाणीव यांच्या प्रकटीकरणाला सुद्धा तो उपयोगी ठरलेला आहे. अभंगातून विविध प्रकारचे भाव व्यक्त होताना दिसतात. त्यात ईश्वर भेटीची तळमळ, मनाची उदासीनता, नाम महात्म्यपर, विठ्ठलभक्तीपर, पंढरीचा महिमा गाणारे आणि आत्मनिवेदानात्मक अशा विविध विषया संबंधित ही रचना आहे. आज्ञ आणि सामान्य जनांना भक्तीमार्गाची सोपी वाट दाखविणारा हा एक वाड्मय प्रकार आहे.

संत नामदेव हे मराठीतील आद्य अभंगकार आहेत. त्यांनी मराठी कवितेला 'अभंग' या छंदाची अर्थपूर्ण जोड दिली. व या कवितेचा प्रवाह सर्व लहान थोर संतांपर्यंत पोहोचविला. त्यामुळे हा प्रवाह बाराव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंत अखंडपणे वाहताना दिसतो. अभंग लेखनाला सुरुवात निवृत्तीनाथा पासून झालेली दिसते निवृत्तीनाथापासून ते निळोबा यांच्यापर्यंत अनेक संतांनी अभंग लेखन केल्याचे दिसून येते. त्यात ज्ञानदेव, सोपानदेव, मुक्ताबाई, नामदेव, जनाबाई, गोराकुंभार, सावता माळी, नरहरी सोनार, चोखामेळा, सोयराबाई, बंकामहार, कर्ममेळा, निर्मळा सेना न्हावी, विसोबा खेचर, जगन्नामित्र नागा, परिसाभागव, जोगा परमानंद, कान्होपात्रा, भानुदास, एकनाथ, तुकाराम, निळोबा, बहिणाबाई, आदी संतांनी अभंगरचना करून भर घातली आहे. म्हणजेच बाराव्या शतकापासून ते सतराव्या शतकापर्यंत विपुल प्रमाणात अभंग निर्मिती झाली. अभंग सरितेतून परमेश्वराच्या प्राप्तीसाठी धडपडणाऱ्या मानवी मनाची विविध दर्शने इथे पाहायला मिळतात. आणि यातूनच भक्तीच्या वाटा उजळ झालेल्या आहेत. सर्व संतांचे आराध्य दैवत पंढरीचा पांडुरंग हे होते. असे असले तरी प्रत्येक संतांच्या अभंगाचे स्वरूप विशेष मात्र भिन्न आहेत.

मराठीतील 'अभंग' वाङमय म्हणजे संत साहित्यातील उत्कट भावकाव्याचा एक मौलिक साठाच वाटू लागतो. स्फुटत्व, उत्कटता, भावनानुभवाची आंतरिकलय, तालबद्धता, प्रतिमाकितता, प्रतीकरुपता, तरलता, संवेदनशीलता, आत्माविष्कार, प्रबळता इ. आधुनिक भावकवितेचे म्हणून ओळखले जाणारे सर्व प्रकृतीविशेष संतांनी निर्मिलेल्या अभंगातून प्रकट होतात. संत साहित्याच्या निकोप वाङमयीन दृष्टिकोनास सर्वाधिक अनुकूल असा संत साहित्यातील वाङमयप्रकार कोणता असेल तर तो 'अभंग' काव्य हाच होय.

'ओवी' प्रमाणेच अभंग हा प्राचीन मराठीतील एक छंद आहे. या संदर्भात ना.ग. जोशी असे म्हणतात की, "ओवीचे" मूळ रूप असून ओवी मालिकेला 'अभंग' हे नाव दिले असावे? आपल्याला स्फुरलेल्या रचनाबंधनाला 'अभंग' हे मोठे औचित्यपूर्ण नाव नामदेव देतात. 'अभंग' हा वाङमयप्रकार प्रामुख्याने वारकरी संप्रदायातील संत कवीने जास्त प्रमाणात हाताळल्याचे दिसून येते. अभंग या वाङमयप्रकाराची थोडक्यात ओळख पुढीलप्रमाणे करून देता येईल.

तीन सहा अक्षरी चरण आणि चौथा चरण चार अक्षरी अशा रचनेला 'मोठा अभंग' असे नाव आहे. याला 'देवद्वार' छंद असेही म्हणतात. ओवीच्या मालिकेला अभंग असे म्हणण्यात येत असले तरी अभंग या नावाची ही परंपरा आढळते. नामदेवांनी अभंगाच्या रचनेविषयी माहिती दिली असून त्यात छोटा अभंग आणि मोठा अभंग महत्त्वाचे आहेत.

**मोठा अभंग**

बावीस अक्षराचे साडेतीन भाग / तीन चरनातील अठरा अक्षरे चौथ्या चरणातील चार अशी बावीस अक्षरे मिळून एक 'चौक' असे सहा 'चौक' म्हणजे मोठा अभंग.

**लहान अभंग**

सोळा अक्षराचे दोन समचरण म्हणजे आठ आठ अक्षराच्या दोन ओळी असलेला अभंग म्हणजे छोटा अभंग. स्वतः नामदेवांनी अक्षरांच्या आणि चौकांच्या संख्येचे बंधन पाळलेले दिसत नाही. एखादे अक्षर जास्त किंवा कमी आणि चौक चार किंवा आठ असेही त्यांच्या अभंगरचनेत दिसून येते. थोडक्यात जो भंगत नाही तो अभंग. म्हणजेच ज्या रचनाबंधात आशयाचा न भंगणारा सलग विस्तार आणि अविष्कारातही नभंगणारा तालाचा ठेका असतो तो अभंग. असे अभंग या वाङमयप्रकाराचे स्वरूप, महत्त्व व प्रकार स्पष्ट करता येतात.

**3. गौळण**

संत साहित्यातील गौळण हा एक महत्वाचा साहित्यप्रकार आहे. संतांनी ज्या काही गौळणी लिहिल्या आहेत. त्यातून श्रीकृष्णाच्या बालक्रीडा वर्णन केलेल्या दिसतात. क्वचित काही गौळणी ह्या शृंगाराकडे वळलेल्या आढळतात. अभंगांमध्येही गौळणीचा समावेश होत असला तरी 'गौळण' म्हणून त्याचा एक स्वतंत्र आकृतीबंध विचारात घेता येतो. मराठीतील एकूण गौळणीचा विचार केला तर श्रीकृष्णाच्या बालक्रीडा गोपींनी यशोदेकडे केलेली गर्हानी, गोपींनी श्रीकृष्णाच्या केलेल्या खोड्या, गौळणीमध्ये असलेली गोपींची भावावस्था, श्रीकृष्ण गोपीसंवाद, कृष्णाचे वेणुवादन व त्यामुळे गोपीची झालेली वेडी प्रेमावस्था. अशा विविध प्रकारे कृष्णविरहाचे लालीत्यपूर्ण दर्शन संतांनी गौळणीच्या माध्यमातून घडविलेले दिसते.

संत ज्ञानेश्वर, नामदेव, जनाबाई, कान्होपात्रा, एकनाथ, तुकाराम, बहिणाबाई आदी संतांनी गौळणीची रचना केल्याचे दिसून येते.

**4. भारुड**

भारुड हा संत साहित्यात उदयाला आलेला एक महत्त्वाचा वाङमयप्रकार आहे. लोकमानसात भक्तीसंप्रदाय दृढ करण्याच्या उद्देशाने या वाङ्मयप्रकाराची योजना संतांनी केल्याचे दिसून येते. 'भारुड' या 'भारूंड' या संस्कृत शब्दावरून आला असावा असे सांगितले जाते. बहुरूढ या शब्दात भारुडची युत्पत्ती शोधण्याचा कै. ल. रा. पांगारकर यांचा प्रयत्न व्युत्पत्तीशास्त्रात संमत होण्यासारखा नाही. 'भा' म्हणजे 'प्रतिभा' म्हणून प्रतिभाजणित अविष्कार ते भारूड ही उपपत्ती अतिव्याप्त आणि काल्पनिक वाटते. तसेच तिसरे मत ही या मताप्रमाणे "भारुड हा मूळ शब्द असून वैदिक गीत आणि द्विमुखी पक्षी असे त्याचे अर्थ होतात. म्हणून व्दयार्थीरचना ते भारुड"[१]. अशी भारुड या शब्दाची व्युत्पती श्री. रं. कुलकर्णी यांनी 'ओवी ते लावणी' या ग्रंथामध्ये सांगितली आहे. ज्ञानेश्वर, नामदेव या संत कवींनी भारुडाची रचना केलेली आहे. "काट्याच्या आणी वर वसति तीन गाव" चिंचेच्या पाणी एक शिवालय उभविले? ही ज्ञानेश्वरांची प्रसिद्ध भारुडे

'मुंगी व्याली शिंगी झाली तिचे दूध किती।

सतरा रांजण भरून गेले पेले बारा हात्ती।
आम्ही लटीकेन बोलू वर्तमान खोटे।'

हे नामदेवांचे प्रसिद्ध भारुड.

भारुड या वाङ्मयप्रकाराचे सामर्थ्य एकनाथांनी ओळखले. त्यातले नाट्य लोकपरंपरेशी असलेले त्यांचे नाते व लोकभाषेचा परिणामकारक वापर या गोष्टी एकनाथानी जाणल्या. ईश्वरभक्तीचा ठसा लोकांच्या मनावर उमटविण्यासाठी त्यांनी भारुडाचा कुशलतेने उपयोग केला. संतांनी दैनंदिन, सामान्य, प्रापंचीक जीवनातील विषय घेऊन ही भारुडे रचलेली आहेत. मनोरंजना बरोबर लोकशिक्षणही व्हावे, हा उद्देश त्यामागे आहे.

**5. विरहिणी**

संत साहित्यात विरहिणी या वाङ्मयप्रकारात संतांनी लेखन केल्याचे दिसून येते. संत ज्ञानेश्वरांच्या विरहिणी प्रसिद्ध आहेत. विरहाची गाणी ती विरहिणी. परमेश्वराशिवायची तगमग विरहिणीमधून व्यक्त होते. परमेश्वरापासून ही स्त्री वेगळी राहूच शकत नाही परमेश्वराशिवाय तिला स्वतंत्र अस्तित्वच नाही. भक्ती आणि प्रीती या दोन भाववृत्ती त्यांच्या अभंगामधुन एकवटतात. त्यामुळेच अनुराग, मिलन, विरह इत्यादी भावनांचा अविष्कार म्हणजेच परमेश्वर भक्तीचेच एकरूप असते. 'चंदनाची चोळी' या अभंगात ज्ञानेश्वरांनी निसर्ग आणि विरहिणीच्या मनाची तगमग यांचा सुरेख मेळ घातला आहे.

**6. पद**

प्राचीन मराठी वाङ्मयात शास्त्रीय संगीतावर आधारित असलेला एक स्फुट वाङ्मयप्रकार म्हणजे पद होय. पद हा वाङ्मयप्रकार लोक संगीतावर आधारित नसून तो रागदारी संगीतावर आधारित आहे. पदरचनेमुळेच संतसाहित्य आणि संगीत याचा अनुबंध मांडता येतो. पद म्हणजे चरण हा अर्थ. 'शास्त्रीय संगीताचा' बाज लेवून अवतरलेली गेयरचना म्हणजे पद. पद म्हणजे स्फुट रचना. ही पदे गाता आली पाहिजे. पदेही गेय असतात. ज्या रचनेचा विषय देवदेवतापर म्हणजे पारलौकिक आहे. जिची जडणघडण कलापूर्ण असून ती गेयपूर्ण असते त्या रचनेला 'पद' ही संज्ञा लावली.

तेराव्या शतकात वारकरी आणि महानुभाव या दोन्ही पंथातील साहित्यात विपुल पदरचना झालेली आढळते. पदाची व्याख्या करताना विजया राज्याध्यक्षांनी मराठी वाङ्मयकोशात अशी नोंद केली आहे की, कीर्तनात गाण्याकरिता विविध छंदांची केलेली कृष्णाधिकांच्या लीला वर्णन करणारी संकीर्तनपर आणि अध्यात्म, भक्ती व नीती यांची शिकवण देणारी उपदेशपर स्फूट रचना म्हणजे पद होय.

**7. आरती**

संतांनी लिहिलेले साहित्य हे भक्तीप्रधान आहे. त्यामुळे 'आरती' हा भक्तीशी निगडित असणारा साहित्यप्रकार होय. वारकरी संप्रदायातील संत कवींनी आरत्या लिहिलेल्या व गायलेल्या दिसतात. 'आरती' हा शब्द 'अर्तीक्य' म्हणजे 'समारंभ' किंवा 'विधी' यावरून आला असावा संस्कृत 'आरात्रिक' 'आरात्रिका' यावरूनही आरती रूप साधले असणे शक्य आहे."[2] आरतीतून भक्तांच्या आर्त

मनोवृत्तीचेकिंवा मनोभावानेचे प्रकटन झालेले असते. त्याचबरोबर परमेश्वरविषयक भक्तीभावही आरतीतून प्रकट होतो. प्रत्यक्ष पूजेच्या प्रारंभी किंवा नंतर आरती म्हटली जाते. आरती ही ईश्वराची प्रार्थना असते आरती हा भक्तीपर पद्यप्रकार असून त्यातील रचना बहुतांश मात्रा वर्तनी जातीची असते.

"अल्पविस्तार असलेली गेय रचना म्हणजे आरती होय". आपण ज्या देवतेची उपासना करतो त्यांचे मूर्तीवर्णन करणे, 'गुणवर्णन करणे' थोडक्यात चरित्र गायन करणे, अशा विविध भावानी आरतीचा अविष्कार झालेला दिसतो. युगे आठावीस विटेवरी उभा । वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा' ही नामदेवालिखित आरती सर्वतोमुखी आहे. तुकाराम, रामदास यांनीही आरत्या लिहिल्या.

**8. भूपाळी**

संत साहित्यात नामदेव व इतर संतांनी हाताळलेला हा साहित्यप्रकार आहे. भूपाळीत प्रातःकाळाचे सुंदर वर्णन केलेले दिसून येते भूपाळी म्हणजे जगाला झोपेतून उठविण्यासाठी म्हणावयाचे सुंदर गाणे. भूपाळी महाराष्ट्रात अत्यंत प्रसिद्ध आहे. "चंद्रकांता" जातीची लक्षणे या रचनेत आढळतात.

**9. श्लोक**

विशिष्ट अक्षर संख्येचे गट किंवा विशिष्ट लगत्वाचे अक्षर गट एकत्र जोडून 'श्लोक' रचना सुरू झालेली होती. श्लोक 'चतुष्पाद' किंवा 'चतुष्पदी' असे हे 'चतु:पाद' म्हणजे काही अक्षरांचे किंवा लगत्वयुक्त मोडणीचे चार गट असत. श्लोक म्हणजे पदबंद दाखवण्यासाठी स्फुट रचनेत एका श्लोकाचे परिणाम अर्थासाठीही गृहीत धरलेले होते. संपूर्ण रामदास वाड्मयामध्ये 'मनाचे श्लोक' आणि 'करुणाष्टके' या काव्यामधून रामदासाच्या अंतरंगाचे दर्शन होते श्लोक हा वाड्मयप्रकार संत साहित्यात संत रामदासांनी हाताळलेला दिसतो.

**10. आख्यानकाव्य**

अख्यानकाव्यापुढे संस्कृत मधील महाकाव्यांचा आदर्श असला तरी या दोन वाड्मय प्रकारात मात्र पुष्कळच अंतर आहे. कथा उपकथांचे एक मोठे जाळेच महाकाव्यातून व्यक्त होत असते. आख्यानकाव्यात एकच एक कथा सांगितलेली असते. अख्यानकाव्य हा वाड्मयप्रकार वारकरी संप्रदायातील संत कवीने हाताल्याचे दिसून येते. थोडक्यात अख्यान म्हणजे 'परंपरेचे आधार असलेले कथात्मक निरूपण म्हणजेच आख्यान होय'.

**समारोप**

संत साहित्य हे विविध पद्यात्मक साहित्यप्रकाराशी संलग्न असल्याचे दिसून येते. या काळातील सर्व साहित्य प्रकाराची निर्मिती ही आज्ञ जनासाठी झालेली आहे. कारण सुरूवातीच्या काळातील ग्रंथ तत्त्वज्ञान सांगणारे होते. साहजिकच त्यांचे आकलन उच्चवर्णीया पूरतेच मर्यादित होते. सर्वसामान्य माणूस या ज्ञानापासून खूप दूर होता अशा या सर्वसामान्य माणसांना त्यांच्याच भाषेत तत्वज्ञान सांगण्याचा प्रयत्न वारकरी संप्रदायातील संतकवींनी ओवी, अभंग, गौळण, भारुड, विरहिणी, पद, आरती, श्लोक, भूपाळी, आख्यानकाव्य या व इतर वाड्मयप्रकाराच्या माध्यमातून केला

आहे. या वाड्मय प्रकाराच्या विवेचनावरून असे लक्षात येते की, संतांनी 'अभंग' या वाड्मयप्रकारात जास्त लेखन केल्याचे दिसून येते. संतांना आपल्या अध्यात्मिक अनुभवाच्या अविष्कारासाठी 'अभंग' हा छंद जवळचा वाटला. कारण अभंगाचे गायन करता येते तसेच अभंगाचे कीर्तनातून सादरीकरण करता येते. प्रस्तुत शोधनिबंधात संत साहित्यातील वाड्मयप्रकाराचा थोडक्यात परिचय करून देण्यात आला आहे

**संदर्भ**

1. श्री रं. कुलकर्णी ओवी ते लावणी पहिली आवृत्ती 1994 पृष्ठ क्र.90
2. ना. ग. जोशी 'मराठी छंदोरचना' (लय दृष्ट्या पुनर्विचार) प्रथम आवृत्ती 1955 पृष्ठ 202

**संदर्भग्रंथसूची**

1. जोशी ना. ग 'मराठी छंदोरचना' (लय दृष्ट्या पुनर्विचार) स्नेहसुद्धा, दांडिया बाजार बडोदे, प्रथम आवृत्ती1955
2. तुकदेव रोहिणी, 'ओवी' छंद:रूप आणि आविष्कार, प्रतिमा प्रकाशन पुणे प्रथम आवृत्ती 2004
3. नसीराबादकर ल. रा. 'प्राचीन मराठी वाड्मयाचा इतिहास' फडके प्रकाशन कोल्हापूर सातवी आवृत्ती 2003
4. वाडीकर भु. द 'प्राचीन मराठी वाड्मयाचा इतिहास' अभय प्रकाशन नांदेड, आवृत्तीपहिली 1996